# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक ७३-२२** **दिनांक - ०७/०३/२०२२**

## महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेल्या गुटख्या पान मसाला विक्रेत्यावर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक ०३.०३.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे पोहवा/९२०३३ उमेश पाटील यांना त्यांच्या खास बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गाळा नं.६ एमआयजी कॉक्लेक्स, पुनमगार्डन, मिरारोड पूर्व येथील याराना बिर्यानी सेंटरचा चालक इम्रान खान नावाचा इसम हा स्वत:चे फायदयकरिता महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधित केलेला गुटख्या व पान मसाला साठवणुक करुन याराना बिर्यानी सेंटर समोर पानाचे गादीवर विक्री करतो तसेच त्याचा भाऊ सोयेब हुसेन याचे मार्फत त्याचे मालकीचे इतर पान गादी सेंटर वरती पोहचवून त्याचे सहकार्यामार्फत महाराष्ट्र प्रतिबंधीत गुटखा, पान मसाला विक्री करतात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने वपोनि पाटील यांनी पोलीस पथक व पंचासह १७.०० वा छापा टाकला असता १) मोहमंद चाँद समीन खान वय २० वर्ष ,२) फयाज इक्बाल सिध्दीकी वय ३० वर्ष ,३) सोयेब इरफान हुसेन उर्फ खान वय २२ वर्ष व पाहिजे आरोपी नामे १) इम्रान इरफान खान सर्व रा. म्हाडा बिल्डीग, रु.नं.१४०६, पिनाकोला बिल्डीगचे समोर, मिरारोड पूर्व, २) फैजल ३) चाचा रा. भाईंदर पुर्ण नांव पत्ता माहिती नाही हे आपसात संगणमत करुन रोख रक्कम ४,३२०/- रु , मोबाइल हॅन्डसेट व १,०९,११२/- रु किंमतीचा गुटख्या असे एकूण १,२८,४३२/- रु किमतीचा वरील वर्णानाचा मानवी शरीरास अपायकारक असलेला तसेच महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटख्या व पान मसाला एमआयजी. कॉम्प्लेक्स या बिल्डीगमधील गाळा नं.६, याराना बिर्यानी सेंटर तसेच रु.नं.७३४ , सातवा माळा, म्हाडा बिल्डीग, मिरारोड पूर्व या ठिकाणी साठवणुक करुन विक्री करीत असतांना मिळुन आल्याने अटक व पाहिजे आरोपी यांच्या विरोधात पोहवा/९२०३३ उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ९०/२०२२ भा.द.वि.कलम ३२८, २७२, २७३, ३४ सह अन्न सुरक्षा व मानके अधीनियम २००६ व नियमने २०११ चे कलम २६(२), २७,२३, २६(२) (४),३०(२)(अे) प्रमाणे सरकार तर्फे माझी फिर्याद आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त,(गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त,(गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पो.हवा./९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, चा.पोना/०६१०६ सम्राट गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

---------oo------------